| | |
|---|---|
| CNR No. MHRG080008522026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५५/२०२६**<br>नलिनी हर्षल महाडिक<br>उर्फ तारामती मारुती नायडू<br>विरुध्द<br>कोणीही नाही. |

## निशाणी क्र.१ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ अन्वये वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र.१ नलीनी हर्षल महाडीक उर्फ तारामती मारुती नायडु ह्या रा. समाज मंदीर रोड, भानवज बौध्दवाडा, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड व अर्जदार क्र.२ पद्मावती अरुण उपार उर्फ पद्मावती मारुती नायडु रा. फ्लॅट क्र. १, योगायोग बिल्डींग, चिन्मयनगर, मोगलवाडी, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील कै. मारुती रामय्या नायडु हे दिनांक ११/१२/२०२५ रोजी आर. डी. नगर, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै. मारुती रामय्या नायडु यांची पत्नी कै. मिना मारुती नायडु ह्या देखील दिनांक २९/१०/२०१८ रोजी टाटा हॉस्पीटल, खारघर येथे कर्करोगाने मयत झाल्या आहेत. तसेच कै. मारुती रामय्या नायडु यांची मोठी मुलगी कै. विजयालक्ष्मी मारुती नायडु ह्या देखील दिनांक ०१/०५/२००१ रोजी इंदीरा नर्सिंग होम, मुंबई येथे अविवाहीत मयत झालेली आहे. कै. मारुती रामय्या नायडु यांना अर्जदार यांच्या व्यतिरीक्त दुसरे कोणीही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार ह्या कै. मारुती रामय्या नायडु यांच्या वारस असल्याने त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी न्यायालयात प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती, परंतु अद्यापपावेतो कोणाकडुनही हरकत नोंदविण्यात आली नाही.

४. अर्जातील कथनाचे व विनंतीचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाल्यावरुन मी खालीलप्रमाणे विवेचनासह उत्तर नोंदविलेले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे का ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता –**

५. अर्जदार क्र.१ यांनी आपल्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.११ वर शपथपत्र दाखल केले आहे. त्यांनी निशाणी क्र.१३ वर कै. मारुती रामय्या नायडु व निशाणी क्र.१४ वर कै. मिना मारुती नायडु यांच्या मुत्यु दाखल्याच्या सत्यप्रती, तसेच निशाणी क्र.१५ वर कै. विजयालक्ष्मी मारुती नायडु यांच्या मृत्यू दाखल्याची सत्यप्रत व निशाणी क्र.४/२ व ४/३ वर अर्जदार क्र. १ व २ यांच्या आधारकार्डच्या सत्यप्रती अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. निशाणी क्र.१२ वर वृत्तपत्रात जाहीर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त निशाणी क्र.७ वर सायटेशन नोटीसीची बजावणी करण्यात आलेली आहे. सायटेशन नोटीस व जाहीर नोटीस ही प्रसिध्द करुन देखील आजतागायत कोणीही अर्जदार यांच्या अर्जास हरकत घेतलेली नाही. निशाणी क्र.१६ नुसार अर्जदार यांनी पुरावा बंद पुरशीस दाखल केली.

६. अर्जदार यांच्या वतीने विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी दाखल केलेले शपथपत्र निशाणी क्र.११ चे अवलोकन केले असता निशाणी क्र.१३, १४ व १५ वर दाखल मृत्यू दाखला यावरुन कै. मारुती रामय्या नायडु हे दिनांक ११/१२/२०२५, कै. मिना मारुती नायडु ह्या दिनांक २९/१०/२०१८ व कै. विजयालक्ष्मी मारुती नायडु ह्या दिनांक ०१/०५/२००१ रोजी मयत असल्याचे दिसते. अर्जदार यांनी पुराव्यात कथन केल्यानुसार, त्यांच्याशिवाय मयतास कोणीही इतर वारस नाहीत. अर्जदार हे कै. मारुती रामय्या नायडु, कै. मिना मारुती नायडु व कै. विजयालक्ष्मी मारुती नायडु यांचे वारस असल्याच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. यावरुन असे दिसुन येते की, अर्जदार हे वरील प्रमाणे नमुद मयत यांचे वारस आहेत.

७. अर्जदार क्र.१ यांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त वरील नमुद मयत यांना कोणीही वारस नसल्याबाबत अर्जदार यांचा पुरावा विना आव्हानीत असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही. कै. मारुती रामय्या नायडु व कै. मिना मारुती नायडु हे आर.डी.नगर बाजारपेठ, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील रहिवासी होते म्हणुन, या न्यायालयास अर्ज चालविण्याचा अधिकार आहे. वरील नमुद मयत व्यक्तिंचे वारस म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वरील विवेचनावरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचा दाखला मिळवण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षास हे न्यायालय आले आहे. यावरुन मुद्दा क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता –</u>**

८. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविले असल्याने अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचित असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र. **१ श्रीमती नलीनी हर्षल महाडीक उर्फ तारामती मारुती नायडु** व अर्जदार क्र. **२ पदमावती अरुण उपार उर्फ पदमावती मारुती नायडु** हे **कै. मारुती रामय्या नायडु, कै. मिना मारुती नायडु व कै. विजयालक्ष्मी मारुती नायडु** यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारुन अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३. | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असुन उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही व ते फक्त अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी देण्यात येत आहे. |
| ४. | मे. नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फी चा तपशिल द्यावा. |
| ५. | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहुन देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्तीपासुन वरील टिपणीस अनुसरुन पुढील पुर्तता करावी. |

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.08.06 18:15:35 +0530

(**एस. एस. देशमुख**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर.

स्थळ – खालापूर,
दिनांक – ०६/०८/२०२६.